उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ताण, कौटुंबिक नातेसंबंध व शैक्षणिक संपादनावर भावनिक परिपक्वता कार्यक्रम विकसनाच्या परिणामांचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे शिक्षण शास्त्र विषयात आंतर-विद्याशाखेंतर्गत पीएच.डी. पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

नयना मच्छिंद्र औताडे

मार्गदर्शक

डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

संशोधन वर्ष

२०२१-२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पान नंबर
१.	प्रस्तावना	०३-०४
२.	संशोधनाची गरज	०४
३.	संशोधनाचे महत्व	०५
४.	समस्या विधान	०५
५.	कार्यात्मक व्याख्या	०५-०६
६.	संशोधनाची उद्दिष्टे	०६
७.	गृहीतके	०६
८.	परिकल्पना	०७
९.	संशोधनाची व्याप्ती	०७
१०.	संशोधनाची मर्यादा	०८
११.	संशोधनाची परीमर्यादा	०८
१२.	संशोधन पध्दती	०८
१३.	जनसंख्या	०८
१४.	नमुना निवड	०९
१५.	माहिती संकलनाची साधने	०९
१६.	संख्याशास्त्रीय साधने	०९
१७.	संशोधनाची कार्यवाही	०९-१०
१८.	प्रकरणीकरण	१०
१९.	कालावधी	११
२०.	अंदाजपत्रक	११
	संदर्भ ग्रंथ सूची	१२-१३

प्रस्तावना :-

दैनंदिन जीवन जगत असतांना प्रत्येक माणसाला विविध समस्यांना सामोरे जावे लागते आणि या समस्या सोडवित असतांना विविध प्रसंगी व्यक्तीला अनेकांशी समायोजन साधावे लागते. यावरुन व्यक्तीचे व्यक्तिमत्व किती समतोल आहे हे समजते. जीवनात प्रत्येक व्यक्ती बहुदा शारीरिक परिपक्वते बाबत जागृत असतो, परंतु भावनिक परिपक्वतेच्या बाबतीत तसे नसते. साधारणपणे कुमार वयानंतर मुले जेव्हा तारूण्यावस्थेत येऊ लागते तेव्हा त्याच्या भावनात्मक वर्तनामध्ये परिपक्वता येऊ लागते. शारीरिकदृष्ट्या सुदृढ असलेल्या तरणांमध्ये दैनंदिन जीवनातील भावनांच्या बाबतीत बहुधा संतुलित वर्तन आढळते. व्यक्तीमध्ये जेव्हा सर्वप्रकारच्या ऋणात्मक आणि धनात्मक भावनांचा विकास होतो आणि प्रसंगाचे औचित्य ओळखून जेव्हा व्यक्ती त्याचे उचित प्रकारे प्रकटीकरण करु लागते तेव्हा भावनात्मक दृष्ट्या ती व्यक्ती परिपक्त झालेली आहे असे म्हणतात. विशिष्ट विषयाचे अध्यापन करणे एवढेच मर्यादित कार्य आज शिक्षकांचे राहिले नसून बालकाच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास, चारित्र्य संवर्धन, नागरिकत्वाचे शिक्षण इत्यादी व्यापक उद्दिष्टे समोर ठेवून शिक्षकाने कार्य करावे ही आजच्या काळाची गरज आहे.

ताणाच्या दोन प्रकारांमधील तात्कालीन ताणापेक्षा दीर्घकालीन ताण हा कमी होणे महत्वाचे असते. ताण नैसर्गिकरित्या कमी होतो, परंतु त्याला वेळ लागतो, तो दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे जरूरीचे ठरते. लिड्झ (१९६५) यांच्यामते कुटुंबातील भूमिकांमध्ये परस्परपूरकतेचा अभाव म्हणजे संबंधात कायम तणाव राहतो. या ताणाचा मुलांवरही परिणाम होतो व हे चक्र चालूच राहते असे त्यांना आढळून आले. कौटुंबिक नातेसंबंधामध्ये भूमिका, स्वभावगुण, संवाद व आंतर वैयक्तिक संबंधात यांचा निकोप विकास झाल्याने कौटुंबिक नातेसंबंध चांगले निर्माण होऊन आरोग्य सुधारते.

प्रस्तुत संशोधनात पालक आणि पाल्य यांच्या नातेसंबंधाचा अभ्यास महत्वाचा असल्याने या चलाचा विचार करणे गरजेचे वाटले.

साधारणपणे कुमार वयानंतर मुले जेव्हा तारूण्यावस्थेत येऊ लागते तेव्हा त्याच्या भावनात्मक वर्तनामध्ये परिपक्वता येऊ लागते. शारीरिकदृष्ट्या सुदृढ असलेल्या तरूणांमध्ये दैनंदिन जीवनातील भावनांच्या बाबतीत बहुदा संतुलित वर्तन आढळते. व्यक्तीमध्ये जेव्हा सर्वप्रकारच्या ऋणात्मक आणि धनात्मक गुणांचा विकास होतो आणि प्रसंगाचे औचित्य ओळखून जेव्हा व्यक्ती

त्यांचे उचित प्रकारे प्रकटीकरण करु लागते तेव्हा भावनात्मक दृष्ट्या ती व्यक्ती परिपक्त झालेली आहे असे म्हणतात.

कोणत्याही कृतीची, यशाची यथार्थ जाणीव ठेवून परिस्थितीचे नीट आकलन करुन घेऊन भावनांचा समतोल राखून कार्यक्षमतेने आत्मविश्वासपूर्ण समायोजन साधून स्वत: समाधान मिळवून इतरांना समाधान देणारी व्यक्ती ही आरोग्यसंपन्न व्यक्ती आहेत असे म्हणता येईल. विद्यार्थी दशेत जर आरोग्य चांगले राहिले तर त्याचे व्यक्तिमत्व सुसंवादी घडेल या दृष्टिकोनातूनच संशोधकाने संशोधनासाठी भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचे विकसन व त्याचा उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक नातेसंबंध व शैक्षणिक संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्यास ही समस्या निवडली आहे.

संशोधनाची गरज :-

घरातील वातावरण प्रेमळ नसेल, मुलांच्या मनात आपलेपणाची भावना निर्माण झाली नसेल व विभक्त कुटुंब असेल तर ब-याच वेळा मुले आपल्या मनातील गोष्टी जवळच्या मित्रांना, घरच्यांना न सांगता मनातच ठेवतात, या गोष्टी सांगाव्यात की नको या संभ्रमात ती असतात आणि या सगळ्या मधूनच गर्दीतला एकटेपणा पाहायला सुरूवात होते. जे विद्यार्थी संवेदनशील मनाचे असतात त्यांची खरी अडचण होते. माझे प्रश्न, माझे प्रॉब्लेम समोरच्या व्यक्ती समोर मांडले तर ती समोरची व्यक्ती माझ्याबद्दल काय विचार करेल त्याच माझ्याबाबतच मत बदलून जाईल का? अशा विचाराने ते आतल्या आत कुढत बसतात. मग मुलांच्या मनात संघर्ष निर्माण होतात, ताण निर्माण होतो. म्हणून सुखी समाधानी जीवन जगण्यासाठी उत्तम आरोग्याची गरज असते. मुलांच्या मानसिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी घर व शाळा यांचे सहकार्य असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पालक व शिक्षक यांची काही कर्तव्य आहेत, परंतु ब-याच वेळा विद्यार्थ्यांकडून वेगवेगळी कारणे सांगितली जातात. म्हणूनच विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता तसेच कुटुंबातील माता पिता, भावंडे इत्यादिंशी असलेले नातेसंबंध कशा स्वरूपात आहेत हे जाणून प्रस्तुत संशोधन गरजचे आहे.

संशोधनाचे महत्व :-

- अध्ययन - अध्यापन करत असतांना शिक्षकांस अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. विद्यार्थ्यांना कोणत्याही गोष्टीचे ज्ञान झाल्यानंतर उत्कृष्ट कृती अपेक्षित असेल तर भावनिक विकास महत्वाचा आहे.
- समवयस्कांशी अधिक परिपक्व संबंध प्रस्थापित करण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.
- पालक व इतर प्रौढांपासून भावनिक स्वावलंबन मिळविण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.
- वर्तनाला मार्गदर्शक ठरतील अशी नैतिक मूल्ये साध्य करण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे. एक यशस्वी विद्यार्थी तयार करण्यासाठी केवळ विद्यार्थ्यांच्या बाह्य वर्तनाला वळण लावणे पुरेसे नाही. हे लक्षात घेऊन योग्य कृतीच्या निष्पत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेला योग्य दिशा देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनाचे महत्व लक्षात येते म्हणून हे संशोधन महत्वाचे आहे.

समस्या विधान :-

"अहमदनगर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ताण, कौटुंबिक नातेसंबंध व शैक्षणिक संपादन यावर भावनिक परिपक्वता कार्यक्रम विकसनाच्या होणा-या परिणामांचा अभ्यास करणे."

कार्यात्मक व्याख्या :-

- **उच्च माध्यमिक :-**

  माध्यमिक व उच्च शिक्षणास जोडणारा दुवा म्हणजे उच्च माध्यमिक

- **ताण :-**

  ज्या घटकांमुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक कार्यक्षमतेत विघटन घडून येते असे घटक.

- **कौटुंबिक नातेसंबंध :-**

  कुटुंबातील व्यक्तींचे एकमेकांशी असलेले संबंध, भूमिका व वागणूक होय.

- **शैक्षणिक संपादन :-**

  विद्यार्थ्यांचे सत्र व वार्षिक परीक्षेतील गुण.

- **भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचे विकसन :-**

  भावनिक प्रतिक्रिया प्रसंगाला अनुसरून व सामान्य स्वरूपाचे होण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमास भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचे विकसन असे म्हणतात.

- **परिणाम :-**

  प्रयोगपूर्व व प्रयोगोत्तर चाचणीतील गुणांच्या फरकाला परिणाम असे म्हटले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या सद्यस्थितीचे मापन करणे.
- भावनिक परिपक्वतेसाठी कार्यक्रमाचे विकसन करणे.
- विकसित भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचा उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक नातेसंबंधावर होणारा परिणाम अभ्यासणे.
- विकसित भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचा उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ताणावर होणारा परिणाम अभ्यासणे.
- विकसित भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचा उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

गृहितके :-

- प्रत्येक विद्यार्थ्यांची मानसिक परिपक्वता वेगवेगळ्या प्रकारची असते.
- प्रत्येक विद्यार्थ्यांचा ताण भिन्न भिन्न स्वरूपाचा असतो.
- प्रत्येक विद्यार्थ्यांचे कौटुंबिक नातेसंबंध वेगवेगळ्या स्वरूपाचे असतात.

परिकल्पना :-

संशोधन परिकल्पना :-

- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भावनिक परिपक्वता कार्यक्रम राबविल्याने त्यांच्या भावनिक परिपक्वतेत वाढ होते.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भावनिक परिपक्वता कार्यक्रम विकसन राबविल्याने त्यांचा ताण कमी होतो.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भावनिक परिपक्वता कार्यक्रम राबविल्याने त्यांच्या कौटुंबिक नातेसंबंधात सुधारणा होते.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भावनिक परिपक्वता कार्यक्रम विकसन राबविल्याने त्यांच्या शैक्षणिक संपादनात वाढ होते.

शून्य परिकल्पना :-

- उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वता सूचीच्या पूर्व व उत्तर चाचणीतील एकूण गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक पडत नाही.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ताणाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक पडत नाही.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमधील कौटुंबिक नातेसंबंध शोधिकेच्या पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक पडत नाही.
- उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पूर्व व उत्तर शैक्षणिक संपादनामध्ये सार्थ फरक पडत नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

- प्रस्तुत संशोधन अहमदनगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांशी संबंधित राहील.
- विद्यार्थ्यांच्या भावनिक घटकांशी संबंधित राहील.
- विद्यार्थ्यांच्या बौध्दिक पातळीशी संबंधित राहील.
- वरील सर्व घटकांच्या परिणामाशी संबंधित राहील.

संशोधनाची मर्यादा :-

- प्रस्तुत संशोधन अहमदनगर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांपुरतेच मर्यादित असणार आहे.
- प्रस्तुत संशोधन विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, भावनिक आणि कौटुंबिक नातेसंबंध या पुरतेच मर्यादित असणार आहे.
- प्रस्तुत संशोध्ंन २०२१ ते २०२३ या कालावधी पुरतेच मर्यादित असणार आहे.

संशोधनाची परीमर्यादा :-

- प्रस्तुत संशोधन अहमदनगर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयापुरतेच मर्यादित राहील.
- प्रस्तुत संशोधनाची भौगोलिक मर्यादा अहमदनगर जिल्ह्यांपुरतीच मर्यादित राहील.
- विद्यार्थ्यांना सत्र परीक्षेत सैध्दांतिक भागाला मिळालेल्या गुणांचा विचार शैक्षणिक संपादन म्हणून केला जाईल.

संशोधन पध्दती :-

शैक्षणिक संशोधन हे वेगवेगळ्या पध्दतीचा उपयोग करुन केले जाते. संशोधनाचा अभ्यास विषय कसा आहे त्यावरून संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो.

प्रस्तुत संशोधनामध्ये भावनिक परिपक्वतेच्या सद्यस्थितीचा अभ्यास असल्यामुळे सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात येईल. सर्वेक्षणातून कार्यक्रम विकसनाची आवश्यकता आढळून आले तर कार्यक्रम विकसन पध्दतीचा उपयोग करुन कार्यक्रम विकसित करण्यात येईल. विकसित कार्यक्रमाची परिणामकारकता पाहण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा उपयोग करण्यात येईल. या सर्व कारणांमुळे प्रस्तुत संशोधनात मिश्र संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

जनसंख्या :-

शैक्षणिक संशोधन प्रक्रियेत समस्येचे उत्तर शोधून संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जी माहिती प्राप्त करावी लागते ती व्यक्ती व संस्थांकडून मिळवावी लागते त्यांना प्रतिसादक म्हणतात. एखाद्या विशिष्ट गटातील सर्व प्रतिसादकांना जनसंख्या म्हणतात.

अहमदनगर जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यातील ४७१ उच्च माध्यमिक विद्यालयातील १,२७,७४२ विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या राहील.

नमुना निवड :-

जनसंख्येचा प्रातिनिधिक स्वरूपाचा लहान गट म्हणजे नमुना होय. नमुना निवडीच्या संभाव्यता नमुना निवड पध्दत व असंभाव्यता नमुना निवड पध्दती अशा दोन पध्दती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतुक नमुना निवड पध्दतीने एकूण १४ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातून ०२ उच्च महाविद्यालयांची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात येईल.

माहिती संकलनाची साधने :-

- मुख्य उद्दिष्ट एक साठी भावनिक परिपक्वता सूची, यशवंत सिन्हा व महेश भार्गव (आप्पा बळवंत चौक, आनंद एजन्सी) या मापनसूचीचा वापर करण्यात येईल.
- ताण मापनासाठी एस. डब्ल्यू. देशपांडे (APA) (आप्पा बळवंत चौक, आनंद एजन्सी), यांची प्रमाणित ताण मापन चाचणी वापरण्यात येईल.
- कौटुंबिक नातेसंबंधासाठी शैरी व सिंहा (आप्पा बळवंत चौक, आनंद एजन्सी), यांची कौटुंबिक नातेसंबंधांची प्रमाणित शोधिका वापरण्यात येईल.
- संशोधक निर्मित चाचणी - सदर चाचणी शिक्षण क्षेत्रात कार्य करणा-या अनुभवी व तज्ञ व्यक्तीकडून प्रमाणित केली जाईल.

संख्याशास्त्रीय साधने :-

भावनिक परिपक्वता सूची, ताण मापन चाचणी, कौटुंबिक नातेसंबंधांची प्रमाणित शोधिका द्वारे जी माहिती मिळेल तिच्या विश्लेषणासाठी शेकडेवारी चा उपयोग करण्यात येईल.

उत्तर चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, टी परीक्षिका यांचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची कार्यवाही :-

प्रस्तुत संशोधनात अहमदनगर जिल्ह्यातील चौदा तालुक्यांपैकी सहा तालुक्यांची निवड सहेतुक पध्दतीने करण्यात येईल. निवडलेल्या सहा तालुक्यातील एकूण उच्च माध्यमिक

विद्यालयांपैकी प्रत्येक तालुक्यातून २ उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात येईल. भावनिक परिपक्वता कार्यक्रमाचे विकसन करण्यात येईल. प्रायोगिक उपचार मात्रेपूर्वी भावनिक परिपक्वता, ताण, कौटुंबिक नातेसंबंधांची पूर्व चाचणी घेण्यात येईल. भावनिक परिपक्वता विकसन कार्यक्रमाचे उपचार मात्रा देण्यात येईल. उपचार मात्रेनंतर संशोधक निर्मित उत्तर चाचणी घेण्यात येईल. उत्तर चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करुन निष्कर्ष काढण्यात येईल.

प्रकरणीकरण :-

सदर संशोधनात एकूण पाच प्रकरणांचा समावेश असेल.

प्रकरण पहिले	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा
प्रकरण तिसरे	संशोधन कार्यपध्दती
प्रकरण चौथे	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
प्रकरण पाचवे	सारांश, निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय
संदर्भ ग्रंथ सूची	
परिशिष्टे	

कालावधी :-

अ.क्र.	शीर्षक	कालावधी
१.	समस्या निर्मिती	२ महिने
२.	उच्च माध्यमिक विद्यालयांचा शोध	३ महिने
३.	आराखडा निर्मिती	२ महिने
४.	संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा	३ महिने
५.	माहिती संकलनाची साधने तयार करणे	३ महिने
६.	प्रत्यक्ष माहितीचे संकलन	१० महिने
७.	माहितीवर प्रक्रिया करणे	६ महिने
८.	माहितीचे विश्लेषण करणे	३ महिने
९.	निष्कर्ष व शिफारशी	२ महिने
१०.	माहितीचे सादरीकरण	२ महिने
	एकूण कालावधी	**तीन वर्ष**

अंदाजपत्रक :-

अ.क्र.	तपशील	खर्च
१.	माहितीचे संकलन व साधनांचे विकसन	१५,०००/-
२.	सर्वेक्षण कार्य	१५,०००/-
३.	पुस्तके, मासिके, नियतकालिके	३०,०००/-
४.	इंटरनेट व इतर सुविधा	१०,०००/-
५.	झेरॉक्स व फोटोग्राफ	१५,०००/-
६.	छपाई, डी.टी.पी., प्रबंध बांधणी	१५,०००/-
७.	प्रवास खर्च	२०,०००/-
	एकूण खर्च	**१,२०,०००/-**

संदर्भ ग्रंथ सूची

- आगलावे, प्रदिप (२००७) **सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर :** श्री साईनाथ प्रकाशन.
- भिंताडे वि. रा., (२००६), **' शैक्षणिक संशोधन पध्दती '** , पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
- बापट भा. गो., (१९७७), **' शैक्षणिक संशोधन पध्दती '** , पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
- घोरमोडे, के. यु. (२००८) **'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे ',** नागपूर : विद्या प्रकाशन.
- मंगळवेढेकर, राजा (१९७७) **'भूमीपुत्र',** अहमदनगर : प्रवरा प्रकाशन.
- रिसवाडकर, म.रा. (२००६) **ग्रंथालय व माहितीशास्त्राची संशोधन पध्दती,** नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- Best, John & Khan, James (2009) **Research In Education**, New Delhi : PHI Learning Private Limited.
- चव्हाण, किशोर (२०११) ऑक्टोबर) **गुणात्मक संशोधन, शिक्षणातील मर्मदृष्टी**, ३०-३३.
- कुंडले, म. बा. (२०१३, ऑक्टोबर) **शिक्षणातील नवप्रवाह**, शिक्षण समीक्षा, ४५-४८.
- जरग, नामदेव (२०११, एप्रिल) **सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन,** जीवन शिक्षण, १२-१६
- पाटील, कृष्णकुमार (२०१३, डिसेंबर) **माध्यमिक शिक्षकांच्या समस्या** शिक्षण संक्रमण, २७-२८.
- Educational Videos & Important Links. (2013), Higher Education, Retrieved 26 August 2014, From http:www.education.com/topic/child-motivation-achievement
- Learning and Your Child. (2014). Motivation & Achievement, Retrieved 26 August 2014, From http://www.education.com/topic/child-motivation-achievement/
- Special Education Resources. (2014), The American Council on Rural Special Education, Retrieved 12 September 2019, From http:www.lesley,edu/special-education – resources/ terms-research in ed.

- The youth workers big book of case studies. (2004), There’s no description for this book yet, Retrieved 12 September 2019, From http://operlibrary.org/works/OL 9273237W/The_Youth_Worker’s_Big_Boo
- Unicef priorities in education, (2000) Innovation in Education, Retrieved 12 September 2019, From http://www.unicef.org/

मार्गदर्शक
डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड

संशोधक
औताडे नयना मच्छिंद्र